# प्रेसनोट

दि. ०६/१०/२०२३

**लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील सहायक पोलीस निरीक्षक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | लोणावळा शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. ४५३/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | स्त्री, वय - ३८ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. देविदास हिरामण करंडे, सहायक पोलीस निरीक्षक, लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये (पन्नास हजार रुपये) |
| पडताळणीमध्ये लाच मागणी रक्कम | १,४०,०००/- रुपये (एक लाख चाळीस हजार रुपये) |

पडताळणी दिनांक :- २३/०९/२०२३ व दि. २६/०९/२०२३.
गुन्हा दाखल दिनांक :- ०६/१०/२०२३.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या विरुद्ध माहे ऑगस्ट/२०२२ मध्ये लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्याचा तपास लोकसेवक देविदास करंडे, सहा.पोलीस निरीक्षक हे करीत होते. लोकसेवक करंडे यांनी तक्रारदार यांचेकडे सदर गुन्ह्याचा अ फायनल पाठविण्यासाठी ५०,०००/- रुपये लाच रक्कम मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक देविदास करंडे, स.पो.नि. यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या व त्यांचेसोबतचे सहआरोपी यांचेविरुद्धच्या गुन्ह्याचा अ फायनल पाठविण्यासाठी पंचासमक्ष तक्रारदाराकडे त्यांचे ४०,०००/- रुपये व सहआरोपी यांचे १,००,०००/- रुपये असे एकूण १,४०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.